# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक २०.०७.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १९.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १७ केसेसमध्ये १८ ईसमांवर कारवाई करून ९,४५२/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. जुगार कायद्याअन्वये ०४ केसेसमध्ये २२ इसमांवर कारवाई करुन २,०९,८२०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच कलम १३५ मपोका कायद्यान्वये ०६ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,५१३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,६९,८५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १९.०७.२०२६ चे १२.०० ते १४.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, अन्न सुरक्षा अधिकारी यांचेसह पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, प्लॉट क्र. ९१७, गली क्र. ०४, नुरी मस्जिदजवळ, टिपु सुलतान चौक येथे राहणारा इसम नामे अलीम नबी अहमद अन्सारी वय ३६ वर्ष याचे घराची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये शासनाने प्रतीबंधीत केलेला वेगवेगळ्या कंपनीचा वेगवेगळे फ्लेवरचे तंबाखु, पानमसाला, तंबाखु पाऊच असा मुद्देमाल मिळुन आला. त्यास मुद्येमालाबाबत विचारपुस केली असता, त्याने उडवा—उडवीचे उत्तरे दिली. आरोपीचे ताब्यातुन डायरेक्टर, जनम, जाफरानी जर्दा, व्हि १, पानबहार ईत्यादी सुगंधीत तंबाखु व पानमसाल्याचे पाकीटे एकुण वजनी ९७ किलो ३०० ग्राम किंमती अंदाजे ८१,३७०/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासनाने प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर अवैधरित्या विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीविरूध्द फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी रविना बबन नागले वय २५ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे कलम १२३,२२३,२७४,२७५ भा.न्या.सं. सहकलम २६(१),२६(२)(iv),२७(३)(e),३०(२)(a),३(१)(iv)(zz) अन्न सुरक्षा मानके अधिनीयम २००६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह यशोधरानगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे तहसिल/शांतीनगर :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०५.२०२६ चे १२.३० ते दिनांक १६.०६.२०२६ चे दरम्यान, पोलीस ठाणे तहसील हद्यीत जागनाथ बुधवारी, तबला मार्केट, पाठराबे मोहल्ला येथे राहणारी आरोपी महिला नामे १) मंदा गोपालराव गुमगावकर वय ४२ वर्ष व तिचा २) शुभम नावाचा साथीदार यांनी संगनमत करुन फिर्यादी सौ. नंदा नितीन बेंडेकर वय ३८ वर्षे, रा. कांजी हाऊस चौक, बिनाकी मंगळवारी, यशोधरानगर, नागपूर हयांना सोसायटी मधुन लोन मंजुर करुन देते असे सांगून त्याकरीता आधार कार्ड, पॅन कार्ड व इतर कागदपत्रे तसेच २०००/— रु. जमा करावे लागतील असे सांगुन, कागदपत्रे व रक्कम घेतली. आरोपींनी फिर्यादी तसेच वस्तीतील इतर ३९ महिलांना लोन मंजुर करुन देतो असे म्हणून सर्वाकडून कागदपत्रे व प्रत्येकी २०००/— प्रमाणे एकूण ८०,०००/— घेतले. आरोपींनी फिर्यादी व इतर महिलांचे कागदपत्रांचा गैरवापर करुन त्यांना लोन मिळवुन न देता तसेच त्यांना कोणतीही माहिती न देता, पैकी एकूण १५ महिलांचे नावाने बॅक खाते उघडून त्या खात्यांमार्फत एकूण ७,५०,७८,९८१/— रु. चा आर्थिक व्यवहार करुन फिर्यादी व इतर महिलांची फसवणूक केली.

तसेच वर नमुद आरोपींनी दिनांक ०४.०६.२०२६ ते १६.०७.२०२६ चे दरम्यान, पोलीस ठाणे शांतीनगर हद्यीत लालगंज, चकणा चौक, सैलानी महाराज अखाडयाजवळ राहणाऱ्या फिर्यादी मानसी विजय निमजे वय २८ वर्ष यांना बचत गटातुन लोन काढून देतो असे सांगून त्यांचेकडून कागदपत्रे घेतली व त्यांचे नावाचे एसव्हीसी को—ऑपरेटीव्ह बॅक लिमीटेड येथे खाते उघडून फिर्यादीस न सांगता अप्रामाणिकपणे फिर्यादीचे खात्यामधुन १७,८५,५००/— रुपयांचा आर्थिक व्यवहार केला व फिर्यादीचे वस्तीतील इतर महिलांकडूनसुदधा लोन मिळवून देण्याचे आमिष दाखवून कागदपत्रे व रक्कम घेऊन फिर्यादी व इतर महिलांची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी दोन्ही फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसिल व शांतीनगर येथे आरोपींविरुध्द आरोपीविरूध्द कलम ३१६(२),३१८(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये वेगवेगळे गुन्हे दाखल केलेले आहेत. आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे कळमणा :—** दिनांक १४.०७.२०२६ चे २२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, चिखली चौक येथे एक अनोळखी पुरूष इसम वय अंदाजे ४० वर्षे वयाचे, आजारी अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल व तेथून मेडीकल हॉस्पीटल, ट्रॉमा सेंटर येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक १९.०७.२०२६ रोजी ०६.३० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. ज्ञानेश्वर मोरे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

२) **पोलीस ठाणे नंदनवन :—** दिनांक १९.०७.२०२६ चे १३.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, दर्शन कॉलनी, नंदनवन येथे नरेश ठाकूरचे घराचे वरचे माळयावर पेंटींग काम करणारे प्रशांत रवि वासनिक वय ३९ वर्षे रा. सुभाष नगर, कामगार कॉलनी, प्रतापनगर, नागपूर हे बालकनीमध्ये पेंटींग काम करीत असता, बाजुने जाणारे विद्युत तारांना त्यांचा स्पर्श झाल्याने, विजेचा धक्का बसून ते वरचे माळयावरुन खाली पडल्याने गंभीर

जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.

यामुळे प्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. नागरगोजे ८४५९६९७३७० यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**